**वाचले** - 1. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली 1982
2. विभागीय दुय्यम सेवा परिक्षा नियमावली 1988
3. The Maharashtra Sub Departmental Examanation (Amendment), Rulas 1993 Dated -20.07.1993
4. लिपिक - टंकलेखकाच्या संवर्गामधून अव्वल कारकून पदावर पदोन्नतीसाठीचे महाराष्ट्र महसूल अर्हता परिक्षा नियम,1999
5. इकडील परिपत्रक क्र. मह. कार्या-1/आस्था-3/आरआर-01/2017 दि. 02.01.2017

---

क्रमांक मह.कार्या-1/आस्था-3/आरआर -189/17
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली
दिनांक - 16 मे, 2017

**आदेश**

वरील वाचले क्रमांक 05 अन्वये सांगली जिल्हयातील अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-यांची दिनांक 01.01.2017 या आधारभूत दिनांकावरील प्राथमिक ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेत आली होती. सदर यादीवर ज्या कर्मचा-यांना हरकती वा सूचना द्यावयाच्या आहेत त्यांना हरकती व सूचना घेणेसाठी दिनांक 15.01.2017 पर्यंत मुदत देणेत आलेली होती.

3/- वाचले क्र.05 अन्वये प्रसिध्द करणेत आलेल्या अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-यांच्या प्राथमिक ज्येष्ठता यादीवर प्राप्त हरकती / सुचना वरील वाचले क्रमांक 01 ते 04 मधील तरतूदीनुसार विचार करणेत येवून सोबतच्या परिशिष्ठ-अ प्रमाणे मान्य/अमान्य करणेत आलेल्या आहेत.

**सही /-XXX**
**(शेखर गायकवाड)**
**जिल्हाधिकारी सांगली**

प्रति,

1. उपविभागीय अधिकारी इस्लामपूर / विटा / मिरज / कडेगांव / जत
2. तहसिलदार मिरज / तासगाव / कवठेमहांकाळ / जत / विटा / कडेगांव / पलूस / आटपाडी / वाळवा / शिराळा
3. शाखा प्रमुख, सर्व ................................ जिल्हाधिकारी कार्यालय सांगली

प्रत - मा. आयुक्त पुणे विभाग पुणे (महसूल आस्थापना) यांना माहितीसाठी सविनय सादर.

**जिल्हाधिकारी सांगली मिरज**

# परिशिष्ठ अ

## (अव्वल कारकून संवर्ग)

| अ.क्र. | हरकत दाराचे / सुचना देणा-यांचे नाव व पदनाम | हरकतीचे स्वरुप थोडक्यात | हरकत मान्य / अमान्य व त्यावरील स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| 1 | श्री. रविंद्र परशुराम तोडकर, अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली (उपचिटणीस शाखा) | दिनांक 02 जानेवारी 2017 रोजीचे अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-याची प्राथमिक जेष्ठता यादीमध्ये माझे नांव अ.क्र.04 वर असून सदर जेष्ठता यादीमधील रकाना क्रमांक 10 मध्ये पदोन्ती तारीख दि.06/08/2006 अशी नमूद आहे. सदरची तारीख चुकीची असून माझी पदोन्नती तारीख दि. 08/06/2006 अशी नमूद आहे. तरी सेवा जेष्ठता यादीमध्ये तशी दुरुस्ती होणेची विनंती केलेली आहे. | जिल्हाधिकारी कार्यालय सांगलीकडील आदेश क्रमांक मह.कार्या-1/आस्था-1/अकाने (868)/2006 दिनांक 08.06.2006 अन्वये श्री तोडकर यांना लिपिक टंकलेखक संवर्गातून अव्वल कारकून संवर्गात पदोन्नती देणेत आलेली आहे. **हरकत मान्य.** |
| 2 | श्री. दत्तात्रय भगवान बुरसे, अव्वल कारकून, तहसिलदार कार्यालय, शिराळा | दिनांक 02 जानेवारी 2017 रोजीचे अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-याची प्राथमिक जेष्ठता यादीमध्ये माझे नांव अ.क्र.83 वर असून त्यामध्ये श्री.डी.व्ही. बुरसे, ऐवजी श्री. दत्तात्रय भगवान बुरसे व जन्मतारीख दि. 06/02/1971 ऐवजी दि.02/06/1971 अशी दुरुस्ती होवून मिळावी अशी विनंती केलेली आहे. | श्री बुरसे यांनी त्यांच्या संपूर्ण नावाबाबत व प्रत्यक्ष जन्म तारखेच्या पुराव्यादाखल शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर केलेली आहे. **हरकत मान्य.** |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | श्री. यशवंत उमाजी बांडे, अव्वल कारकून, तहसिलदार कार्यालय, विटा | दिनांक 01 जानेवारी 2017 रोजीचे अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-याची प्राथमिक जेष्ठता यादीमध्ये माझे नांव अ.क्र.94 वर असून त्यामध्ये जन्म तारीख दि. 12/10/1980 ही बरोबर नमूद केली असून सेवानिवृत्तीचा दि.31/10/2030 हा चुकीचा नमूद केलेला आहे. तरी सेवानिवृत्ती दिनांक दुरुस्त होणेची विनंती केलेली आहे. | श्री बांडे यांचा जन्म दिनांक 12.10.1980 असून त्यानुसार त्यांचा सेवानिवृत्ती दिनांक 31.10.2038 असा येईल. **हरकत मान्य.** |
| 4 | श्रीमती. एम.एच.दौंड, अव्वल कारकून, तहसिलदार कार्यालय, विटा | दिनांक 02 जानेवारी 2017 रोजीचे अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-याची प्राथमिक जेष्ठता यादीमध्ये माझे नांव अ.क्र. 143 वर असून माझे नावासमोरील कॉ.क्र.8 मध्ये सदयाचे संवर्गात हजर दिनांक माझे नावासमोर नमूद केलेचे दिसून येत नाही. परंतू मी दि.20/07/2016 रोजी पुरवठा निरिक्षक तहसिलदार कार्यालय, विटा या पदावर हजर झालेले असून सोबत हजर रिपोर्टसादर केलेला करुन हजर दिनांक नमूद करणेची विनंती केलेली आहे. | श्रीमती दौंड यांनी त्या पदोन्नतीने पुरवठा निरीक्षक, तहसिल कार्यालय खानापूर विटा या पदावर दिनांक 20.07.2016 रोजी हजर झालेबाबतच्या अहवालाची छायांकित प्रत सादर केलेली आहे. **हरकत मान्य.** |
| 5 | श्री. किसन रामहरी सुतार, अव्वल कारकून, तहसिलदार कार्यालय, विटा | दिनांक 02 जानेवारी 2017 रोजीचे अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-याची प्राथमिक जेष्ठता यादीमध्ये माझे नांव अ.क्र.100 वर असून माझे नाव किसन रामचंद्र सुतार असे आहे. तरी माझे नांव किसन रामहरी सुतार असे नमूद करावे अशी विनंती केलेली आहे. | श्री किसन सुतार यांनी पुराव्यादाखल त्यांचे सेवापुस्तकाच्या पहिल्या पानांची साक्षांकित प्रत सादर केलेली आहे. हरकत मान्य. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | माझ्यानंतर लिपीक पदावर दि.12/08/2005 रोजी नेमणूक झालेली आहे. मी सेवेत लिपीक पदावर दि.15/12/2003 रोजी हजर झालेली आहे. व महूसल अर्हता परीक्षा दि.08/02/2010 रोजी पास झालेली असून माझी पदोन्नती दि.01/06/2011 रोजी झालेली आहे. तरी माझी लिपीक पदावरील नियुक्तीची दिनांक व महसूल अर्हता परीक्षा उत्तीर्ण दिनांक विचारात घेवून श्रीमती. गवळी यांचे पदोन्नतीची दिनांक 18/01/2010 ही मानीव दिनांक मिळणेस नम्र विनंती केलेली आहे. | रोजी उतीर्ण झालेल्या असल्याने सदरचा दिनांक हा त्यांचा लिपीक संवर्गातील ज्येष्ठता दिनांक ग्राहय धरावा लागेल. सबब, दिनांक 01.01.2017 रोजी अव्वल कारकून संवर्गाच्या यादीत निश्चीत करणेत आलेल्या ज्येष्ठता क्रमांक योग्य आहे. **<u>हरकत अमान्य</u>.** |
| 8 | श्री. जी. एल. शेटयापगोळ, अव्वल कारकून तहसिलदार कार्यालय, जत | दिर्नाक 02 जानेवारी 2017 रोजीचे अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-याची प्राथमिक जेष्ठता यादीमध्ये माझे नांव अ.क्र.16 वर आहे. सदर यादीमध्ये माझ्यासमोरील रकाना क्रमांक 04 येथे प्रवर्ग अ.ज. असे नमूद आहे. तरी त्या ठिकाणी वि.मा.प्र. अशी दुरुस्ती होणे बाबत विनंती केलेली आहे. | श्री शेटयापगोळ यांनी ते वि.मा.प्र. या जात प्रवर्गातील असलेबाबत Cast Certificate Scrutiny Committee Pune Division, Committee No.2 Kolhapur यांचेकडील जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक Committee Decision No. 98699 Dated 04.06.2015 सादर केलेले आहे. **हरकत मान्य.** |
| 9 | श्री. दादासाहेब एस.पुकळे, अव्वल कारकून तहसिलदार कार्यालय, पलुस | दिनांक 02 जानेवारी 2017 रोजीचे अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-याची प्राथमिक जेष्ठता यादीमध्ये माझे नांव असून माझे शिक्षण व जन्म तारीख यांची चुकीची नोद झाली आहे. माझे शिक्षण एच.एस.सी. अशी नोंद झाली आहे. मात्र माझे शिक्षण बी.ए. आहे व माझी जन्म तारीख दि.17/10/1974 अशी आहे. मात्र | श्री पुकळे यांनी पुराव्यादाखल त्यांच्या सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत सादर केलेली असून त्यानुसार त्यांची शैक्षणिक अर्जता बी. ए. असून जन्म दिनांक 17.10.1974 अशी आहे. **हरकत मान्य.** |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | श्रीमती. हेमा रंगराव संकपाळ, अव्वल कारकून, तहसिलदार कार्यालय, जत | दिनांक 02 जानेवारी 2017 रोजीचे अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-याची प्राथमिक जेष्ठता यादीमध्ये माझे नांव अ.क्र.61 वर आहे. अ.क्र.59 शुभांगी तानाजी जाधव (शुभांगी सुभाष तारळेकर) आणि अ.क्र.60 श्री. हसन इमामसो निडोणी, आमची एकाच वेळी लिपीक पदावर नव्याने नेमणूक करणेत आलेली आहे. मी नेमणूकीचे आदेशानुसार दि.04/12/2003 रोजी कार्यालयीन वेळेपुर्वी तहसिल जत येथे लिपीक या पदावर हजर झाले आहे. माझ्यानंतर अ.क्र.59 व 60 हजर झालेले आहेत. तसेच सदर यादीमध्ये माझे आडनाव संकपाळ ऐवजी संपकाळ असे झालेले आहे. तरी वरीलप्रमाणे दुरुस्ती होवून मिळणेची विनंती केलेली आहे. | जिल्हाधिकारी कार्यालय, सांगलीकडील आदेश क्रमांक मह-1/कार्या-1/लिने (07)/2003 दिनांक 02.12.2003 अन्वये श्रीमती हेमा रंगराव संकपाळ, श्री हसन इमामसो निडोणी व श्रीमती शुभांगी सुभाष तारळेकर (जाधव) यांना लिपिक टंकलेखक पदावर नियुक्ती झालेली आहे. त्यानुसार श्री संकपाळ या दिनांक 04.12.2003 रोजी नियुक्तीच्या पदावर हजर झालेबाबत सेवापुस्ताकातील नोंदीची छायांकित प्रत सादर केलेली आहे. तसेच श्री निडोणी व श्रीमती तारळेकर (जाधव) हे अनुक्रमे दिनांक 08.12.2003 व दिनांक 06.12.2003 रोजी नियुक्तीच्या पदावर हजर झालेले आहेत. सबब, **हरकत मान्य.** |
| 7 | श्रीमती. एस. बी. काटकर, अव्वल कारकून, जिल्हा पुरवठा कार्यालय, सांगली | दिनांक 02 जानेवारी 2017 रोजीचे अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-याची प्राथमिक जेष्ठता यादीमध्ये माझे नांव अ.क्र.62 वर आहे. सदर यादीमध्ये माझा अ.क्र.52 वर येणे अपेक्षित होते. परंतू माझा आक्षेप अ.क्र.51 श्रीमती. गवळी यांचे अ.क्र.बाबत आहे. कारण त्यांना महसूल अर्हता परिक्षा पास होणेचे अटिवर पदोन्नती देणेत आलेली होती. परंतू त्यांना पदोन्नती दिनांक 18/01/2010 रोजी देणेत आलेली आहे. तसेच महसूल अर्हता परीक्षा दि. 31/12/2010 रोजी उत्तीर्ण झाली आहे. व त्यांची सेवेत | श्रीमती.उषा ल.गवळे हया विभागीय दुय्यम सेवा परिक्षा व महसूल अर्हता परीक्षा विहीत मुदतीत व संधीत उतीर्ण आहेत. तथापि, श्रीमती.काटकर या विभागीय दुय्यम सेवा परीक्षा विहीत मुदतीनंतर दिनांक 24.12.2008 रोजी उतीर्ण झालेल्या आहेत. श्रीमती.गवळे हया विहीत मुदतीत परीक्षा उतीर्ण झाल्याने दिनांक 12.08.2005 हा त्यांचा लिपीक संवर्गातील मुळ ज्येष्ठता दिनांक अबाधीत राहिल. तथापि, श्रीमती.काटकर हया विभागीय दुय्यम सेवा परीक्षा विहीत मुदतीनंतर दिनांक 24.12.2008 |

| | | | |
|---|---|---|---|
| 11 | श्री. एच. आय. निडोणी, अव्वल कारकून, तहसिलदार कार्यालय, तासगांव | **<u>हरकत क्रमांक 01 -</u>** दिनांक 02 जानेवारी 2017 रोजीचे अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-याची प्राथमिक जेष्ठता यादीमध्ये माझे नांव अ.क्र. 60 वर नमूद आहे. सदर यादीतील अ.क्र.53 वर श्री.हणमंत सदाशिव कदम हे सेवेत दि.01/05/2005 रोजी हजर झालेले आहेत. श्री. कदम हे दि.24/12/2008 रोजी विभागीय दुय्यम परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. तसेच दि.31/12/2010 रोजी महसूल अर्हता परीक्षा उत्तीर्ण झालेने त्यांची दि.31 मे 2011 रोजी अ.का. संवर्गात पदोन्नती झालेली आहे. अ.का. संवर्गात दि.01/06/2011 रोजी हजर झालेले आहेत. तसेच अनुक्रमांक 54 चे ठिकाणी नमूद कर्मचारी श्री. जयवंत नामदेव लाड, हे सेवेत दि.01/09/2005 रोजी हजर झालेले आहेत. श्री.लाड हे दि.24/12/2008 रोजी विभागीय दुय्यम परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत तसेच दि.31/12/2010 रोजी महसूल अर्हता परीक्षा उत्तीर्ण झालेने त्यांची दि.31/05/2011 रोजी अ.का. संवर्गात पदोन्नती झालेली आहे. अ.का. संवर्गात दि.02/06/2011 रोजी हजर झालेले आहेत.<br>**<u>हरकत क्रमांक 02 -</u>** मी सेवेत दि.08/12/2003 रोजी हजर झालेलो असून सदर यादीत दि.12/08/2003 अशी चूकीची तारीख नमूद | **<u>हरकत क्रमांक 01 -</u>** श्री.हणमंत सदाशिव कदम व श्री.जयवंत नामदेव लाड हे विभागीय दुय्यम सेवा परिक्षा व महसूल अर्हता परीक्षा विहीत मुदतीत व संधीत उतीर्ण आहेत. तथापि, श्री.निडोणी हे विभागीय दुय्यम सेवा परीक्षा विहीत संधीनंतर दिनांक 24.12.2008 रोजी उतीर्ण झालेले आहेत. श्री.कदम व श्री.लाड हे विहीत मुदतीत परीक्षा उतीर्ण झाल्याने दिनांक 01.09.2005 हा त्यांचा लिपीक संवर्गातील मुळ ज्येष्ठता दिनांक अबाधीत राहिल. तथापि, श्री.निडोणी हे विभागीय दुय्यम सेवा परीक्षा विहीत संधीनंतर दिनांक 24.12.2008 रोजी उतीर्ण झालेले असल्याने सदरचा दिनांक हा त्यांचा लिपीक संवर्गातील ज्येष्ठता दिनांक ग्राहय धरावा लागेल. सबब, दिनांक 01.01.2017 रोजी अव्वल कारकून संवर्गाच्या यादीत निश्चीत करणेत आलेला ज्येष्ठता क्रमांक योग्य आहे. **हरकत अमान्य.**<br>**<u>हरकत क्रमांक 02 -</u>** आस्थापना शाखेकडील अभिलेख पडताळणी केली असता, श्री. निडोणी यांचा लिपीक संवर्गातील सलग सेवा दिनांक 08.12.2003 आहे. **<u>हरकत मान्य.</u>**<br>**<u>हरकत क्रमांक 03 -</u>** श्री. निडोणी यांनी त्यांची शैक्षणिक अर्हता एम.ए.बी.एड बाबत दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा, मद्रास व शिवाजी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सेवाज्येष्ठता यादीत दि. 17/04/1974 अशी नोंद झाली आहे. तरी जन्म तारीख व शिक्षण यांची दुरुस्त होणेस विनंती केलेली आहे. | |
| 10 | श्रीमती. यास्मीन रसुल मुलाणी, अव्वल कारकून, तहसिलदार कार्यालय, तासगांव | **<u>हरकत क्रमांक 01 -</u>** दिनांक 01 जानेवारी 2017 रोजीचे अव्वल कारकून संवर्गातील कर्मचा-याची प्राथमिक जेष्ठता यादीमध्ये माझे नांव अ.क्र. 35 वर असून श्री.संजय संकपाळ अव्वल कारकून यांचा क्रमांक 33 असा आहे. मा.विभागीय आयुक्तसो यांचेकडील दि. 21 जुन 2016 प्रसिध्द करणेत आलेल्या दिनांक 01/01/2015 रोजीच्या सेवा ज्येष्ठता यादीमध्ये श्री.एस.पी. संकपाळ हे माझे नंतर अं.क्र.375 वर असून माझा ज्येष्ठता क्रमांक 369 वर आहे. तर जिल्हा ज्येष्ठता यादीमध्ये श्री.संकपाळ हे माझे अगोदर अ.क्र.33 वर आहेत. तरी माझे अ.का. संवर्गातील हजर दिनांक लक्षात घेवून माझे नाव श्री.संकपाळ यांचे अगोदर समाविष्ठ होवून मिळणेस विनंती आहे.<br>**<u>हरकत क्रमांक 02 -</u>** माझी जन्म तारीख दिनांक 05/09/1972 असून त्यानुसार माझी सेवानिवृत्ताची तारीख दि.30/09/2030 येणे आवश्यक आहे. तथापी सेवाजेष्ठता यादीमध्ये सेवानिवृत्तीची तारीख दि. 31 मे 2030 नमूद करणेत आली आहे. ती दुरुस्ती होणेस विनंती आहे. | **<u>हरकत क्रमांक 01 -</u>** श्री.संजय पाडुरंग संकपाळ हे विभागीय दुय्यम सेवा परिक्षा व महसूल अर्हता परीक्षा विहीत मुदतीत व संधीत उतीर्ण आहेत. तथापि, श्रीमती.मुलाणी या विभागीय दुय्यम सेवा परीक्षा विहीत संधीनंतर दिनांक 24.06.2002 रोजी उतीर्ण झालेल्या आहेत. श्री. संकपाळ हे विहीत मुदतीत परीक्षा उतीर्ण झाल्याने दिनांक 23.12.1999 हा त्यांचा लिपीक संवर्गातील मुळ ज्येष्ठता दिनांक अबाधीत राहिल. तथापि, श्रीमती मुलाणी हया विभागीय दुय्यम सेवा परीक्षा विहीत संधीनंतर दिनांक 24.06.2002 रोजी उतीर्ण झालेल्या असल्याने सदरचा दिनांक हा त्यांचा लिपीक संवर्गातील ज्येष्ठता दिनांक ग्राहय धरावा लागेल. सबब, दिनांक 01.01.2017 रोजी अव्वल कारकून संवर्गाच्या यादीत निश्चीत करणेत आलेल्या ज्येष्ठता क्रमांक योग्य आहे. **<u>हरकत अमान्य.</u>**<br>**<u>हरकत क्रमांक 02</u>** - श्रीमती.मुलाणी यांचा जन्मदिनांक 05.09.1972 असून त्यानुसार त्यांचा सेवानिवृत्ती दिनांक 30.09.2030 असा नमुद करणे आवश्यक आहे. **<u>हरकत मान्य.</u>** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | केलेली आहे. सदर हजर तारीख दुरुस्त होणेस विनंती आहे.<br>**<u>हरकत क्रमांक 03 -</u>** तसेच माझी शैक्षणिक अर्हता सदर यादीत बी.ए. अशी नमूद असून माझी शैक्षणिक अर्हता एम.ए.बी.एड. अशी आहे त्याचप्रमाणे नमूद होणेस विनंती आहे.<br>**<u>हरकत क्रमांक 04 -</u>** मा.विभागीय आयुक्त पुणे यांचेकडील दि.01/01/2015 रोजीचे अंतिम जेष्ठता यादीमध्ये माझे अनु.क्रमांक 501 चे ठिकाणी नमूद आहे. उक्त कर्मचारी यांची नावे अनुक्रमे 511 व 512 येथे नमूद आहेत. सदर कर्मचारी हे सेवेत हजर दिनांकास कनिष्ठ आहेत व मी त्यांना वरीष्ठ आहे. सदर कर्मचारी व मी विभागीय दुय्यम सेवा व महसूल अर्हता परिक्षा एकाच वेळी उत्तीर्ण झालेलो आहे. व अ.का. संवर्गात पदोन्न्ती व सदर संवर्ग हजर एकाच तारखेला हजर झालेले असताना माझे सदर यादीमध्ये नाव अ.क्र.60 चे ठिकाणी चूकीचे नमूद झालेचे दिसून येते. तरी सुधारीत जेष्ठता यादीमध्ये माझे नाव उक्त नमूद कर्मचा-यांच्या नावा अगोदर नमूद होणे आवश्यक आहे. अशी विनंती केलेली आहे. | विदयापीठ, कोल्हापूर यांचेकडील गुणपत्रके सादर केलेली आहेत. **<u>हरकत मान्य.</u>**<br>**<u>हरकत क्रमांक 04</u>** - हरकत क्रमांक 01 च्या खुलाश्यामध्ये नमुद केलेप्रमाणे श्री. कदम व श्री. लाड हे दिनांक 24.12.2008 रोजी विभागीय दुय्यम सेवा परीक्षा विहीत संधीत व मुदतीत उतीर्ण झाल्याने, त्यांचा लिपीक संवर्गातील दिनांक 01.09.2005 हा ज्येष्ठता दिनांक अबाधित राहील. मात्र, श्री.निडोणी हे सुध्दा श्री.कदम व श्री.लाड यांचेसोबतच दिनांक 24.12.2008 रोजी विभागीय दुय्यम सेवा परीक्षा उतीर्ण झालेले आहेत. परंतू, ते सदरची परीक्षा विहीत संधी व मुदतीनंतर उतीर्ण झालेले आहेत. त्यामुळे लिपीक संवर्गातील त्यांचा ज्येष्ठता दिनांक 24.12.2008 हा ग्राहय धरणे आवश्यक आहे. त्यानुसार दिनांक 01.01.2017 या आधारभूत दिनांकावर प्रसिध्द करणेत आलेल्या ज्येष्ठता यादीमध्ये दर्शविण्यात आलेले ज्येष्ठता क्रम योग्य आहेत. **<u>हरकत अमान्य.</u>** |

जिल्हाधिकारी, सांगली करितां,